2

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

आ.जा./क्र./422/२०२५ दि. ०६/१०/२०२५

**प्रती,**

पदव्युत्तर शेक्षणिक विभाग /संलग्नित महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय: महात्मा ज्योतिबा फुले यांच्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याबाबत.**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्य, विचारधारा आणि सामाजिक योगदानावर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा गोंडवाना विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांनी तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभागाने स्वतःच्या स्तरावर आयोजित करावयाची आहे तरी कृपया स्पर्धेत सहभागी होण्याची इच्छा असलेल्या विभागांनी/महाविद्यालयांनी 15 ऑक्टोबर 2025 पर्यंत खालील Google Form लिंक किंवा QR कोडद्वारे आपली माहिती भरावी.

**नोंदणी लिंक/QR कोड: [https://forms.gle/AtKqUPNWBrE6oTt68]**

स्पर्धा आयोजित केल्यानंतर स्पर्धेचा संक्षिप्त अहवाल व विजेत्या विद्यार्थ्यांची माहिती संबंधित अध्यासन केंद्राच्या ई-मेल आयडीवर सादर करावी: ई-मेल आयडी: **[wadhairajani@unigug.ac.in]**

**पारितोषिक वितरण कार्यक्रम:**

विजेत्या विद्यार्थ्यांना 28 नोव्हेंबर 2025 रोजी, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित व्याख्यान कार्यक्रमात पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा, ही विनंती.
आपला सहकार्य अपेक्षित आहे.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी विषय:**

1. महात्मा फुले: सामाजिक क्रांतीचे अग्रदूत.
2. ज्योतिबा फुले यांचे शिक्षणविषयक योगदान.
3. स्त्री-शिक्षणासाठी महात्मा फुले यांचा संघर्ष.
4. सत्यशोधक समाज: एक सामाजिक परिवर्तनाची चळवळ.
5. महात्मा फुले यांचे विचार-आजच्या काळाची गरज.
6. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले: परिवर्तनाचे प्रेरणास्रोत.
7. जातिव्यवस्थेविरुद्ध महात्मा फुले यांचा लढा.
8. महात्मा फुले यांचे विचार आणि आजचा युवा वर्ग.

9. महात्मा फुले: समतेचा संदेश देणारा महामानव.
10. महात्मा फुले यांचे कार्य – आजच्या भारताला दिशा देणारे.
11. महात्मा फुले यांचे  अंधश्रद्धा विरोधी विषयी विचार.

समन्वयक
क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली